FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

पहिली खबर 0167745

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( **Under Section 154 Cr. P.C.**)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि. मुंबई, पहिली खबर क्र. १८, वर्ष २०२०, दिनांक २१/१०/२०२०
   State District Police Station FIR No. Year Date
2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act १९८८, कलमे Sections
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections
3. (a) अपराधाची घटना : बार सोमवार, तारीख पासून १९/१०/२०२० वेळ १४-३०, तारीख पर्यंत २०/१०/२०२० वेळ १४.२०
   Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख २१/१०/२०२०, वेळ १४.३०
   Information received at P. S. Date Time
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ०१/२०२०, तारीख २१/१०/२०२० वेळ २.००
   General Diary Reference : Entry No. Date Time
4. माहितीचा प्रकार Type of Information : प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..........., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव उप प्रमुख आरोग्य (इ-प) शहर यांचे कार्यालय, ३रा माळा ठिकाणाचे नंबर ..........., गल्ली ..........., रस्त्याचे नाव विद्यालंकार
   Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण हनुमान मंदिर, वडाळा (पूर्व) गाव ........ पोस्ट ........, तालुका ..........., जिल्हा मुंबई, राज्य महाराष्ट्र.
   Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ..........., तालुका ..........., जिल्हा..........., राज्य ...........
   In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव श्री. पांडुरंग बोरगे (b) वडिलांचे / पतीचे नाव बापू
   Name Father's / Husband's Name
   (c) जन्म तारीख व वय ०१/०६/१९७३, ४७ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 9867093928
   Date of Birth and Age Nationality Phone No.
   (e) पारपत्र क्रमांक —, दिल्याचा दिनांक —, दिल्याचे ठिकाण — (f) व्यवसाय चायनिज पदार्थ विक्री
   Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ..........., जनजात Sub-Caste ...........
   (h) पत्ता रु.नं.२१ उमराई चाळ, गल्ली / सर्व्हे नं. ...... घर / नाव नं. ........ फोन / मो. नं. ........ पॅन नं. ........ वोटर्स नं. ........
   Address : Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
   रस्त्याचे नाव ना.म. जोशी मार्ग, जवळचे प्रसिद्ध ठिकाण बकरी अड्डा, गाव भायखळा, पोस्ट ..........., पो. स्टे. आग्रीपाडा
   Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
   तालुका ..........., जिल्हा मुंबई, राज्य महाराष्ट्र, सध्याचा पत्ता ...........
   Taluka Dist. State Present Address
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
   यशवंत तानु धडाशी, वय ५२ वर्षे, धंदा- नोकरी (शिपाई)
   रा.ठि. वैष्णवी पार्क, B-305, विजय नगर, सम्राट अशोक प्रा. स्कुल
   जवळ, कल्याण (पूर्व), जि-ठाणे.

फिर्याद दि. २९/१०/२०२०

श्री. पांडुरंग बापू बोरगे, वय ४७ वर्षे, धंदा- चायनिज पदार्थ विक्री, रा. ठी. रु. नं. २१. फ़रभाई चाळ, ना. म. जोशी रोड, भायखळा, बकरी अड्डा, मुंबई - ४०००११ यांची सविस्तर फिर्याद स्वतंत्र कागदावर संगणीकृत करण्यात आली आहे. तिच गुन्ह्याची पहिली खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष,

[signature] २१/१०/२०२०

( विजयकुमार डोके)
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.वि., मुंबई.

[signature] २१/१०/२०२०

जबाब

दि. २१/१०/२०२०

श्री. पांडुरंग बापू बोरगे, वय ४७ वर्षे, धंदा– चायनीज पदार्थ विक्रेता फेरीवाला, रेडक्रॉस गल्ली, मौलाना आझाद रोड, आग्रीपाडा, मुंबई. रा.ठि. उमरभाई चाळ, रुम नं. २१, एन.एम. जोशी रोड, मुंबई–११, मो.क्र. ९८६७९३९२८

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर मागील १३ वर्षापासून कुटुंबियासह रहात आहे. वर नमुद पत्त्यावर सध्या माझ्यासोबत माझी पत्नी सौ. मनिषा, दोन मुली व एक मुलगा असे मिळून राहतात. मी रेडक्रॉस गल्ली, मौलाना आझाद रोड, आग्रीपाडा, मुंबई येथील रस्त्यावर चायनिज पदार्थ तयार करुन विक्री करतो. त्यातुन मिळणाऱ्या पैशावर माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.

शॉप क्र. १८, फॅन्सी रंगवाला मार्केट, मोरलॅड रोड, अग्रीपाडा, मुंबई येथे माझा दुकान गाळा आहे. नमुद गाळयाच्या शेजारील गाळा क्रमांक १९ या गाळेधारकाने माझा गाळा क्र.१८ मध्ये अनधिकृतपणे अतिक्रमण केले आहे. माझा गाळा क्र. १८ मध्ये बेकायदेशीरपणे केलेल्या अतिक्रमणाविरूध्द मला बृहन्मुंबई महानगरपालिकेत तक्रार करायची आहे. दुकान गाळयात झालेल्या अतिक्रमणाविरूध्द तक्रार करण्यासाठी गाळयाचे नकाशाची आवश्यकता आहे. त्यासाठी १) सी.एस.क्र. २/१८६२ येथील असलेल्या जागेवर संबंधित मार्केटचा नकाशा २) रंगवाला मार्केट यांनी सी.एस.क्र. २/१८६२, भायखळा विभाग यांच्याकडून कोणकोणत्या परवानग्या व नकाशा देण्यात आलेला आहे त्याची माहिती ३) रंगवाला मार्केट येथील बांधण्यात आलेल्या संपुर्ण बांधकाम नकाशा मिळण्याबाबत उपप्रमुख अभियंता (इ.प्र.) शहर विदयालंकार मार्ग, हनुमान मंदिर समोर, वडाळा (पु), मुंबई ३७ येथे माहिती अधिकार कायद्या अंतर्गत माहिती मिळण्यासाठी दि. १५/०९/२०२० रोजी अर्ज केला होता. माहिती अधिकार कायद्या अंतर्गतची माहिती देण्यासाठी उप मुख्य अभियंता, इमारत प्रस्ताव शहर, वडाळा (पु), मुंबई येथील शिपाई घडशी यांनी माझेकडे रू. १,०००/– रूपयांची लाचेची मागणी केली.

उप मुख्य अभियंता, इमारत प्रस्ताव शहर, वडाळा (पु), मुंबई येथील शिपाई घडशी यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक १९/१०/२०२० रोजी समक्ष हजर राहून लाप्रवि कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पो.नि. डोके यांनी शिपाई घडशी हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत मला लेखी तक्रार अर्ज लिहून देण्यास सांगितले. मला मराठी लिहिता वाचता येत नसल्याने पो.नि. डोके यांना मी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे मराठी भाषेमध्ये अर्ज स्वत: कॉम्प्युटरवर टंकलिखित करून त्याची प्रिंट काढून मला मराठीतून वाचून दाखविला व त्यावर माझी सही घेतली. त्यानंतर दोन शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची माझेशी ओळख करून दिली. पोनि. डोके यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. डोके यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पोनि डोके यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला. त्या दिवशी शिपाई घडशी यांच्या कार्यालयाची वेळ संपत आल्याने पोनि डोके यांनी माझे अर्जावर दिनांक २०/१०/२०२० रोजी कारवाई करण्यात येईल असे मला सांगितले.

पोनि डोके यांनी सांगितल्याप्रमाणे मी दिनांक २०/१०/२०२० रोजी ला.प्र.वि कार्यालयात सकाळी १०.०० वाजता हजर झालो. सदरवेळी सपोआ माने व दोन पंच लाप्रवि कार्यालयात हजर होते. पोनि डोके यांनी दिनांक २०/१०/२०२० रोजी पंचांसमक्ष उप मुख्य अभियंता, इमारत प्रस्ताव शहर, वडाळा (पु), मुंबई येथील शिपाई घडशी यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पोनि डोके यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून फाईव गार्डन, माटुंगा पुर्व, मुंबई येथे थांबलो. त्यानंतर मला पोनि डोके यांनी शिपाई घडशी, उप मुख्य अभियंता, इमारत प्रस्ताव शहर, वडाळा (पु), मुंबई यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. पाटील यांचे सह पाठविले असता लोकसेवक घडशी यांची भेट झाली. त्यावेळी लोकसेवक घडशी, गवळी यांचेशी कामासंदर्भात वेगवेगळी चर्चा झाली. चर्चेदरम्यान लोकसेवक घडशी यांनी माझेकडे रू. १,०००/— लाचेची मागणी केली.

त्यानंतर मी पुन्हा फाईव गार्डन, माटुंगा पुर्व, मुंबई येथे उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ आलो. पोनि डोके यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक घडशी याने पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व लोकसेवक याने लाचेची रक्कम तात्काळ मागणी केली असल्याने त्वरीत सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझे कडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. १,०००/— (रू. २००/— दराच्या ५ भारतीय चलनी नोटा) स्वतःचे ताब्यात घेतल्या. सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. पोनि डोके यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझा चेहऱ्यावर लावलेला मास्क खाली वर करून पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पोलीस वाहनात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावली व माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पंच श्री. पाटील यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक घडशी यांचे उप मुख्य अभियंता, इमारत प्रस्ताव शहर, वडाळा (पु), मुंबई येथे पाठविले. माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी, लोकसेवक घडशी यांच्या केबीनजवळ गेलो असता लोकसेवक घडशी हे केबीनच्या बाहेर मिळून आले. लोकसेवक घडशी यांच्याशी कामासंदर्भात चर्चा करीत असतानाच त्यांनी माझेकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केली. लोकसेवक घडशी यांनी मागितल्यानंतर माझे कडील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. १,०००/— (रू. २०० दराच्या ५ भारतीय चलनी नोटा) त्यांना दिली असता त्यांनी त्यांच्या शर्टाच्या वरच्या डाव्या खिशामध्ये ठेवली. लोकसेवक घडशी यांनी लाचेची रक्कम घेतल्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अशारीतीने माझा चेहऱ्यावर लावलेला मास्क खाली वर करून सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीसांनी तात्काळ लोकसेवक घडशी यांस रू. १,०००/— लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.

माझे मालकीचे आग्रीपाडा येथील दुकान गाळयामध्ये झालेल्या अतिक्रमणाविरूध्द तक्रार करण्यासाठी गाळयाच्या नकाशाची मला आवश्यकता होती. त्यासाठी मी माहिती अधिकार कायदया अंतर्गत माहिती मिळण्यासाठी उप मुख्य अभियंता, इमारत प्रस्ताव शहर, बृहन्मुंबई महानगरपालिका, वडाळा, मुंबई येथे अर्ज केला होता. सदरची माहिती देण्यासाठी या कार्यालयातील लोकसेवक यशवंत तानू घडशी, शिपाई यांनी माझेकडे दि. २०/१०/२०२० रोजी रू. १,०००/— लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारली म्हणुन माझी त्याचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे. माझे लोकसेवक घडशी यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मला मराठीतुन वाचून समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

21/10/2020

( विजयकुमार डोके ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ............ — ............

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down **details** on blank back page.

............ — ............

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ............ — ............

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ............ — ............

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नमुद तारीख, वेळी व ठिकाणी यातील आलोसे यशवंत तानु घडशी यांनी फिर्यादी यांचेकडे माहिती अधिकार कायद्या अंतर्गत मागणी केलेली कागदपत्रे देण्या करीता रु. १०००/- ची लाचेची मागणी करुन ती स्विकारली. आलोसे यशवंत तानु घडशी यांनी स्वतः करीता लाच रकमेच्या स्वरूपात गैरलाभ मिळविला म्हणून भ्र.प्र. अधिनियम-१९८८ कलम-७ अन्वये गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

विजयकुमार डोके, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ............

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to................................................ (3) Transferred to P. S. ................................................ District................................................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name विजयकुमार डोके

पदनाम Rank पोलीस निरीक्षक.

तपासिक अं. चा कोड क्र. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................

1. Date and time of submitted to the Court.

Posting

Code No. of I. O. ............

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**